**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ३३
**दुरध्वनीक्र.** ०२०-२७३५०१२० ई मेल आयडी- dcphq.pcpc-mh@gov.in

दिनांक - १३/०९/२०२४

**खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथक, गुन्हे शाखेची कामगिरी**

---

# रेकॉर्डवरील गुन्हेगारास ०२ पिस्टल, व ०४ जिवंत काडतुसासह अटक

चालू गणेशोत्सव व आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये अवैध शस्त्रे बाळगणारे किंवा कोणत्याही प्रकारचे शस्त्र बाळगुन गुन्हा करणारे गुन्हेगारांविरुध्द विशेष मोहिम राबवुन कारवाई करणेबाबत मा.पोलीस आयुक्त यांनी दिलेल्या आदेशान्वये, दिनांक १२/०९/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांची माहिती काढत असतांना, पोलीस हवालदार आशिष बोटके यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ग्रीनव्हॅली पार्क समोर, विश्रांतवाडी, आळंदी-वडगांव रोड, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे येथे एक इसम थांबलेला असुन, त्याचेजवळील बॅगेत पिस्टल आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, सापळा लावून, इसम नामे दर्शन शिवाजी खैरनार, वय २५ वर्षे, रा. करंजेनगर बालाजी बिल्डींग, फ्लॅट नं. ०७, ए विंग, दुसरा माळा, शिक्रापूर, पुणे यास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातुन **किं.रू १,०२,०००/-रु. किंमतचे ०२ देशी बनावटीचे पिस्टल, ०४ जिवंत काडतुसे (राऊंड)** जप्त करण्यात आले असुन, त्याचे विरुध्द आळंदी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर २६६/२०२४ आर्म ॲक्ट कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३)सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अटक आरोपी दर्शन शिवाजी खैरनार हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्याचे विरुध्द शिक्रापूर पोलीस ठाणे येथे अवैध शस्त्र बाळगणे व इतर गुन्हे दाखल आहे.**

सदरची कारवाई पोलीस आयुक्त मा.श्री. विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त मा. श्री.वसंत परदेशी, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री.संदिप डोईफोडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ मा. श्री.बाळासाहेब कोपनर, यांचे मार्गदर्शनाखाली, खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोउपनि सुनिल भदाणे, पोलीस अंमलदार आशिष बोटके, प्रदीप गोडांबे, सुनिल कानगुडे, किशोर कांबळे, यांचे पथकाने केली आहे.

(संदिप डाईफोडे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड